यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : scholarship@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (०२५३) २२३००५० / २२३१४७८
शिष्यवृत्ती कक्ष, विद्यार्थी सेवा विभाग Scholarship Section, Student Services Division

जा. क्र. विसेवि/शिष्यवृत्ती/2026-27/JulyBatch/सूचनापत्र/81/117 दिनांक : 13/06/2026

# सूचनापत्र शैक्षणिक सत्र 2026-27 (जुलै) तुकडी

## शैक्षणिक सत्र 2026-27 मध्ये शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश अर्ज व शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करताना | 2 |
| 2 | ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यापूर्वी | 3 |
| 3 | ऑनलाईन शिष्यवृत्ती सादर करताना | 4 |
| 4 | ऑनलाईन शिष्यवृत्ती सादर केल्यानंतर | 5 |
| 5 | परिशिष्ट 1 विद्यार्थ्यांचे हमीपत्र 1 | 8 |
| 6 | परिशिष्ट 2 भाग 1 अभ्यासकेंद्राचे हमीपत्र | 9 |
| 7 | परिशिष्ट2 भाग 2 संपर्क सत्र हजेरीपत्रक | 10 |
| 8 | परिशिष्ट 3 विद्यार्थ्यांचे हमीपत्र 2 | 11 |
| 9. | परिशिष्ट 4 विद्यार्थ्यांची प्राथमिक माहिती व हमीपत्र 3 | 12 |
| 10. | परिशिष्ट 5 आवश्यक Documents माहिती | 13 |
| 11. | परिशिष्ट 6 विद्यार्थी व पालकांचे हमीपत्र | 14 |
| 12. | परिशिष्ट 7 प्रवर्गानुसार शासनाचे विभाग व विभागवार शिष्यवृत्ती योजनांचा तक्ता | 15 |

**सुप्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

**शैक्षणिक सत्र 2026-27 ची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया जुलै 2026 मध्ये सुरु होत आहे.. मात्र, प्रवेशापूर्वी शिष्यवृत्तीसंदर्भातील सविस्तर माहिती मिळावी व शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेल्या दस्तऐवजांची विद्यार्थ्यांना वेळेत पूर्तता करता यावी यासाठी सदर सूचनापत्र/नियमावली प्रसिद्ध करत आहे.**

**शिष्यवृत्ती योजना ही केंद्र व राज्य शासनाची असून, मुक्त विद्यापीठ त्यासाठी दुव्याचे काम करते. योजना शासनाची असल्यामुळे पात्र व्यक्तींनाच याचा लाभ मिळावा/अपात्र किंवा चुकीच्या व्यक्तींना लाभ मिळू नये, यासाठी शासनाने काही अटी/शर्ती तयार केल्या आहेत. या अटी/शर्तींचे पालन करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक असून, या अटी/शर्तींच्या आधारे मुक्त विद्यापीठात प्रवेशित/प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुढील नियमावली तयार करण्यात आली असून, विद्यार्थ्यांनी संपूर्ण नियमावली वाचून, त्यात सूचविल्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

**शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील संगणकाच्या उजव्या बाजूला असलेल्या शिष्यवृत्ती टॅबमधील शैक्षणिक सत्र 2026-27 च्या सूचनापत्राचे काळजीपूर्वक वाचन करणे आवश्यक आहे.**

**ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया व MahaDBT 2.0 संकेतस्थळावरील ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू झाली नसली तरी आवश्यक असलेली माहिती आपणास मिळावी व योग्य दस्तऐवेजांची जुळवाजुळव वेळेत करता यावी, यासाठी या सूचना देण्यात येत आहे.**

**ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करताना**

- विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबवरील हे सूचनापत्र संपूर्ण, जबाबदारीने आणि काळजीपूर्वक वाचावे.
- ycmou.digitaluniversity.ac या विद्यापीठ संकेतस्थळावरील Admission Tab वर क्लिक करून प्रथम प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या शिक्षणक्रमांची माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचूनविद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करावा.
- ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करताना विद्यार्थ्याने परिपूर्ण अर्ज सादर करावा. यात विद्यार्थ्याचा अस्तित्वात असलेला व पालकांचा असे दोन भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जात त्रुटी असल्यास याबाबत विद्यार्थ्याला मेलद्वारे कळविले जाते. त्यामुळे विद्यार्थ्याने अर्जात स्वत:चाच mail id नमूद करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचा mail id नसल्यास विद्यार्थ्याने तो तयार करून घ्यावा व नमूद करावा, mail id व password जतन करून ठेवावा.
- ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करताना त्यात शिष्यवृत्ती पर्यायाने प्रवेश घेणार असल्याचे **(YES/होय)**नमूद करावे.
- शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्पुरता पात्र (Provisional Eligible) करण्यात येतो. शासनाकडून शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर किंवा विद्यार्थ्याकडून माहितीपुस्तिकेतील संपूर्ण प्रवेश शुल्क जमा झाल्यानंतरच विद्यार्थ्याचा प्रवेश अंतिमत: निश्चित (पात्र) करण्यात येतो.
- अनुसूचित जाती (SC) , अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT), इतर मागास वर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गाच्या (EWS) विद्यार्थ्यांना या विद्यापीठाकडून कुठलीही शिष्यवृत्ती मिळत नाही, मात्र शासनाकडून मिळणा-या शिष्यवृत्ती योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ मिळून, उपरोक्त प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी **शिष्यवृत्तीचा पर्याय स्वीकारून प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना शिक्षणक्रम शुल्कामध्ये सवलत मिळते. मात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर करताना आवश्यक दस्तऐवज अपलोड न केल्यास/प्रवेश अर्जात त्रुटी असल्यास /नव्याने सुरु होणार असलेल्या महाडिबीटी 2.0 या शासनाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर न केल्यास/ विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जात त्रुटी असल्यास /विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज संबंधित शासकीय विभागांनी अपात्र ठरविल्यास अथवा इतर कुठल्याही कारणाने विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज रद्द झाल्यास विद्यार्थ्याला शिक्षणक्रम शुल्कात मिळणारी सवलत रद्द करण्यात येईल व विद्यार्थ्याला संपूर्ण शुल्क जमा करून प्रवेश निश्चित करावा लागेल.**
- ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करताना विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती पर्यायामध्ये कुठल्याही कारणाने **नाही/No** असा पर्याय निवडल्यास प्रवेश घेऊ इच्छिणा-या शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क ऑनलाइन पद्धतीने जमा करणे बंधनकारक असेल मात्र

त्यानंतरही विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती अर्ज सादर करावयाचा असल्यास विद्यार्थ्याला ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करता येऊ शकेल व शासनाकडून विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज मंजूर होऊन विद्यापीठाकडे शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त झाल्यास, योग्य रक्कमेचा परतावा विद्यापीठाकडून विद्यार्थ्याच्या आधार लिंक बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल.

- शिष्यवृत्ती पर्यायाने प्रवेश घेणार असल्याचे नमूद केल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज सादर करताना सूचित केलेले सर्वच आवश्यक दस्तऐवजांच्या (Documents) मूळ प्रती (Original Copies) अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच **या सूचनापत्रासोबत दिलेले परिशिष्ट 3 व परिशिष्ट 4 एकत्रितपणे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.**
- विद्यार्थ्याने आवश्यक असलेले सर्वच दस्तऐवजांच्या मूळ प्रती (Original Copies) प्रवेश अर्ज सादर करताना अपलोड न केल्यास विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती पर्यायाने असलेला प्रवेश रद्द करण्यात येईल, त्यानंतर विद्यार्थ्यास माहितीपुस्तिकेत नमूद केलेले संपूर्ण शुल्क जमाकरून प्रवेश निश्चित करता येईल.
- आपल्या जात प्रवर्गासाठी / आपण प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमासाठी शिष्यवृत्ती योजना लागू आहे की नाही याची विद्यार्थ्याने विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबवरील माहिती वाचून व **MahaDBT 2.0** https://mahadbt2.maharashtra.gov.in/ या शासनाच्या शिष्यवृत्ती संकेतस्थळावरून खातरजमा करणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्तीसाठी **आवश्यक दस्तावेजांची यादी (परिशिष्ट 5)** याच संकेतस्थळावर दिलेली आहे. ती बघून सर्व दस्तावेजांच्या मूळ प्रतींच्या स्कॅन प्रती तयार ठेवाव्यात व विद्यापीठ संकेतस्थळावरून ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करताना, तसेच **MahaDBT 2.0** संकेतस्थळावरून ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना अपलोड कराव्यात.
- शिष्यवृत्ती पर्यायाने प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जाची तपासणी करण्यात येईल. अर्ज व दस्तऐवज योग्य असल्यास विद्यार्थ्यांना अंशत: शुल्क जमा करण्यासाठी Payment Link उपलब्ध करून देण्यात येईल. सदर Payment Link वर क्लिक करून अंशत: शुल्क जमा करणे बंधनकारक असेल, शुल्क जमा केल्यानंतरच विद्यार्थ्याचा प्रवेश तात्पुरता पात्र करण्यात येईल. जे विद्यार्थी शुल्क जमा करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश होणार नाही.
- प्रवर्गनिहाय शिष्यवृत्ती देय असलेल्या शिक्षणक्रमांचा मार्गदर्शक तक्ता विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमध्ये नंतर प्रसिद्ध करण्यात येईल.
- **विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज भरला म्हणजे प्रवेश निश्चित झाला, असा गैरसमज कृपया करून घेऊ नये.**
- विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर केल्यानंतर, ठराविक कालावधीने विद्यापीठ संकेतस्थळावरील स्वत:च्या प्रवेश अर्जाचे Status / Text Message / mail तपासत राहणे आवश्यक आहे.

## ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यापूर्वी

- विद्यार्थ्यांच्या प्रवर्गानुसार शासनाच्या विविध विभागांमार्फत शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात. **प्रवर्गानुसार शासनाचे विभाग व विभागवार शिष्यवृत्ती योजनांचा तक्ता (परिशिष्ट 7)** या सूचनापत्रासोबतच दिलेला आहे. विद्यार्थ्यांनी याच योजनांसाठी अर्ज करावेत, याव्यतिरिक्त योजनांना अर्ज करू नये. विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवर्गानुसार कार्यरत असलेल्या विभागांतर्गत दर्शविलेल्या शिष्यवृत्ती योजनेबद्दलची माहिती mahadbt संकेतस्थळावरून समजून घेणे आवश्यक आहे. संबंधित शिष्यवृत्तीबद्दलचे शासन निर्णय महाडीबीटी संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तेही विद्यार्थ्यांनी वाचावेत.
- **प्रवर्गनिहाय शिष्यवृत्ती देय असलेल्या शिक्षणक्रमांचा मार्गदर्शक तक्ता** विद्यापीठ संकेतस्थळावरील याच शिष्यवृत्ती टॅबमध्ये नंतर प्रसिद्ध करण्यात येईल.

- **ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना**
- शासनाच्या निर्देशानुसार **MahaDBT 2.0** https://mahadbt2.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचा Online शिष्यवृत्ती अर्ज सादर करावयाचा आहे.
- जे विद्यार्थी 2026-27 (जानेवारी व जुलै तुकडी) च्या प्रवेशित शिक्षणक्रमाला प्रथमच शिष्यवृत्ती अर्ज सादर करीत आहेत अशा विद्यार्थ्यांनी **Fresh** हा पर्याय निवडायचा आहे.
- ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक **सत्र 2025-26किंवा त्यापूर्वी** प्रवेशित शिक्षणक्रमाच्या प्रथम किंवा द्वितीय वर्षाला ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर केला होता, अशा विद्यार्थ्यांनी **Renewal** हा पर्याय निवडायचा आहे.
- ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांनी सदर सूचनापत्रात कळविल्याप्रमाणे परीपूर्ण अर्ज सादर करावयाचा असून, विद्यार्थ्याचा व पालकांचा असे अस्तित्वात असलेले **दोन भ्रमणध्वनी क्रमांक व अस्तित्वात असलेला विद्यार्थ्याचाच mail id** नमूद करणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्याचा मेल आयडी नसल्यास त्यांनी नविन मेल आयडी बनवून मेल आयडी नमूद करायचा आहे. भविष्यातील वापरासाठी मेल आयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे आवश्यक आहे.
- महाडीबीटी संकेतस्थळावर दिसत असलेल्या सर्वच योजना या विद्यापीठाला लागू नाहीत, **सोबत जोडलेल्या परिशिष्ट 7 मध्ये प्रवर्गानुसार शासनाचे विभाग व विभागवार शिष्यवृत्ती योजनांचा तक्ता दिलेला आहे.** या तक्त्यातआपल्या प्रवर्गासाठी जी योजना आहे त्याच योजनेचा अर्ज सादर करावयाचा आहे. या **तक्त्याव्यतिरिक्त (परिशिष्ट 7)** इतर योजना या विद्यापीठाला लागू नसल्याने, अशा योजनांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरू नये. अशा अर्जांची तपासणी होणार नाही व पर्यायाने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही मिळणार नाही.
- मा. आयुक्त समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि. 21.03.2012 च्या पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/बँक वितरण/का-4/2012/407 नुसार य.च.म.मुक्त विद्यापीठाला **शिष्यवृत्ती देय असून फ्रिशीप देय नाही** त्यामुळे फ्रिशीपचा अर्ज विद्यार्थ्यांनी भरू नये.
- ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना **महाविद्यालयाच्या नावाच्या ठिकाणी स्वत:चे महाविद्यालयाचे (विद्यार्थी सहायता केंद्राचे/अभ्यासकेंद्राचे) नाव न निवडता Yashwantrao Chavan Maharashtra Mukt Vidyapeeth असे निवडावे**.
- अर्ज भरताना मान्यता प्रकार **Non Granted** निवडावा.
- Fee Reciept मध्ये ऑनलाइन पद्धतीने अंशत**: शुल्क जमा केलेल्या शुल्काची पावती व ऑनलाइन सादर केलेला प्रवेश अर्जाचे पहिले पृष्ठ** एकत्रित स्कॅन करून अपलोड करावे. (Bonafide Certificate ची आवश्यकता नाही)
- **अनुसूचित जमातीच्या**विद्यार्थ्यांनी Current Course Details मध्ये **Regular Mode** निवडावा.
- अनुसूचित जमाती प्रवर्गाव्यतिरिक्त **इतर सर्वच प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी Current Course Details मध्ये Distance Mode** हाच पर्याय निवडावा.
- शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या उत्पन्न मर्यादेतील **स्वत:च्या/वडिलांच्या/विवाहित महिलांनी पतीच्या** नावे असलेल्या **(आर्थिक वर्ष 2025-26)** उत्पन्न दाखल्याची मूळ प्रत अपलोड करावी. (ज्या विद्यार्थ्यांचा अर्ज Renewal आहे, अशा विद्यार्थ्यांनी सदर शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचा अर्ज सादर करताना ज्या आर्थिक वर्षाचा उत्पन्न दाखला अपलोड केला होता, तोच दाखला अपलोड करावा.
- ज्या विद्यार्थ्याच्या **वडिलांचा मृत्यू झालेला आहे** अशा विद्यार्थ्यांनी **आईच्या नावे असलेला उत्पन्न दाखला व वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र** एकत्रित स्कॅन करून अपलोड करावे.
- सर्वच प्रवर्गाच्या (Caste Category) विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र (Caste Certificate) अपलोड करावे. मात्र **व्यावसायिक शिक्षणक्रमास** (उदा. MBA/ BCA/B.Ed. Special Education या शिक्षणक्रमाला (CET देऊन प्रवेश घेतला आहे) प्रवेशित विद्यार्थ्यांनी **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity)** एकत्रित स्कॅन करून अपलोड करावे. व्यावसायिक शिक्षणक्रमांसाठी शिष्यवृत्ती अर्ज सादर करणा-या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र अपलोड न केल्यास विद्यार्थ्याचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
- **विजाभज (VJNT), इमाव (OBC) व विमाप्र (SBC)**प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी Non Creamy Layer अपलोड करण्यासाठी सुविधा उपलब्ध नसल्यास **जात प्रमाणपत्र व Non Creamy Layer** एकत्रित स्कॅन करून अपलोड करावे.

- **आर्थिक दुर्बल घटक EWS प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरताना EWS प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. EWS प्रमाणपत्र, मूळ TC, उत्पन्न दाखला व परिशिष्ट 5 मध्ये दिलेले इतर दस्तावेज अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नसल्यास, सुविधा उपलब्ध असलेल्या इतर Documents सोबत हे प्रमाणपत्र व इतर दस्तावेज एकत्रितपणे स्कॅन करून अपलोड करावे.**
- **मूळ टीसी अपलोड करणे आवश्यक असल्यामुळे** सर्वच प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी मूळ टीसी अपलोड करावी. मूळ टीसी ही सध्या प्रवेशित शिक्षणक्रमापूर्वी जो शिक्षणक्रम पूर्ण केला त्याची असावी. मूळ टीसी अपलोड केली नसल्यास शिष्यवृत्ती अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. (उदा. विद्यार्थी शैक्षणिक सत्र 2026-27 मध्ये प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम. शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छित असेल तर शैक्षणिक सत्र 2025-26 किंवा त्यापूर्वी 12 वी /समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असल्याची मूळ LC/TC अपलोड करावी, विद्यार्थी पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमासाठी प्रवेशित असेल तर शैक्षणिक सत्र 2025-26 किंवा त्यापूर्वी पदवी अथवा इतर विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असल्याची मूळ TC अपलोड करावी.)
- **केवळ याच विद्यापीठातून पदवी उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी** पदवी/पदव्युत्तर शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यास या विद्यापीठाच्या पदवीपूर्वी इतर मंडळ/संस्था/विद्यापीठातून उत्तीर्ण केलेल्या शिक्षणक्रमाची **मूळ LC/TC** अपलोड करावी.
- मूळ टीसी अपलोड करण्यासाठी पर्याय उपलब्ध नसल्यास **गुणपत्रिका व मूळ टीसी एकत्रित स्कॅन करून** अपलोड करावी.
- शैक्षणिक सत्र 2026-27 मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात 12 वी नंतर कुठल्याही कालावधीत खंड असल्यास **खंड प्रमाणपत्र (Gap Certificate)** अपलोड करणे बंधनकारक आहे.
- **विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज भरला म्हणजे शिष्यवृत्ती मंजूर झाली असा गैरसमज कृपया करून घेऊ नये विद्यापीठ मुख्यालयातील शिष्यवृत्ती कक्ष व विद्यार्थ्याच्या प्रवर्गाशी संबंधित विभाग (समाजकल्याण कार्यालय, नाशिक, VJNT/OBC/SBC कार्यालय, नाशिक आदिवासी विकास विभाग, नाशिक तसेच उच्च शिक्षण विभाग, पुणे) यांचेमार्फत विद्यार्थ्याने भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची व सोबतच्या दस्तावेजांची तपासणी झाल्यानंतरच शिष्यवृत्ती अर्ज मंजूर होतो. अर्जात त्रुटी असल्यास शिष्यवृत्ती कक्षाकडून मेलद्वारे त्रुटी कळवून त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात येते. मात्र विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत त्रुटींची पूर्तता न केल्यास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.**

## ऑनलाईन शिष्यवृत्ती सादर केल्यानंतर

- सर्वच प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी पुढीलप्रमाणे Documents च्या मूळ प्रतींच्या स्कॅन प्रती शिष्यवृत्ती कक्षाच्या scholarship@ycmou.ac.in या मेलवर पाठवाव्यात
    - **File 1 - परिशिष्ट 1. परिशिष्ट 2 (भाग 1 व 2) आणि ना हरकत पत्र, (यापूर्वी सध्या प्रवेशित असलेल्या शिक्षणक्रमाच्या समान स्तरावरील शिक्षणक्रम किंवा व्यावसायिक शिक्षणक्रम ज्या नियमित महाविद्यालयातून पूर्ण केला आहे, त्या महाविद्यालयाकडून घ्यावे.) या दस्तऐवजांच्या मूळ प्रती** एकत्रित स्कॅन करून **एक संच** तयार करावा या संचाला File 1 असे नाव द्यावे.
    - **File 2 - शिष्यवृत्ती अर्जाचे पहिले पृष्ठ, प्रवेश अर्जाचे पहिले पृष्ठ, शुल्क जमा केल्याची पावती, शिक्षणात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र, परिशिष्ट 3, परिशिष्ट 4 आणि परिशिष्ट 6 हे दस्तऐवज** एकत्रित स्कॅन करून दुसरा संच तयार करून या संचाला ला File 2 असे नाव द्यावे.
    - **File 3 – आवश्यक Documents (उदा. SSC,HSC/समकक्ष, पदवी, पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका, मूळ LC/TC, या सूचनापत्रात सांगितल्याप्रमाणे उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास), CET निकाल, रहिवासी प्रमाणपत्र, Non Creamy Layer, रेशनकार्ड, विद्यार्थ्याचे नाव, बँकेचे नाव, खाते क्रमांक व IFSC स्पष्ट दिसेल असे पासबुकचे पृष्ठ किंवा Cancelled Check तसेच उपरोक्त File 1 व File 2 व्यतिरिक्तच्या इतर सर्वच दस्तऐवज** एकत्रित स्कॅन करून तिसरा संच तयार करावा. या संचाला ला **File 3** असे नाव द्यावे.
    - **उपरोक्त File 1, File 2 व File 3 अशा तीन स्वतंत्र Scan Files शिष्यवृत्ती कक्षाच्या मेलवर विद्यार्थ्याने महाडिबीटी संकेतस्थळावर नोंदविलेल्या स्वत:च्याच mail id वरून पाठवाव्यात.**

**महत्वाचे**

- विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज परिपूर्ण भरलेला नसल्यास विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.
- विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जात त्रुटी असल्यास याबाबत विद्यार्थ्याला मेलद्वारे कळविले जाते त्यामुळे विद्यार्थ्याने प्रवेश व शिष्यवृत्ती अर्जात mail id नमूद करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते असणे आवश्यक असून सदर खात्याशी विद्यार्थ्याचा आधार क्रमांक संलग्न असला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपले बँक खाते आधारसोबत संलग्न असल्याची खात्री करावी
- जे विद्यार्थी शिष्यवृत्तीचा अर्ज सादर करतील अशा विद्यार्थ्यांची **संपर्कसत्रांना 75 टक्के उपस्थिती अनिवार्य असून, अभ्यासकेंद्राकडून संपर्कसत्र हजेरीपत्रक (परिशिष्ट 2 भाग 2) त्यातील संपूर्ण माहिती नमूद करून त्यावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी, शिक्का घेऊन scholarship@ycmou.ac.in या मेलवर पाठविणे अनिवार्य आहे.**
- ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 टक्के पूर्ण होणार नाही, अशा विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
- या सूचनापत्रासोबत जोडलेल्या विद्यार्थ्याच्या हमीपत्र 1 मधील **(परिशिष्ट 1)** संपूर्ण माहिती नमूद करून व अभ्यासकेंद्राचे हमीपत्र **(परिशिष्ट 2 भाग 1)** माहिती अभ्यासकेंद्र प्रतिनिधींकडून नमूद करून घेऊन त्यावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी, शिक्का घेऊन **मेलद्वारे पाठविणे अनिवार्य आहे.**
- समाज कल्याण कार्यालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मुक्त विद्यापीठात प्रवेशित असताना **कोणत्याही एकाच व्यावसायिक (Professional)/अव्यावसायिक (Non Professional) शिक्षणक्रमाला शिष्यवृत्ती देय आहे.**
- विद्यार्थ्याने पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या एकाच स्तरावरील एक शिक्षणक्रम मुक्त विद्यापीठ किंवा इतर पारंपारिक विद्यापीठातून पूर्ण केला असल्यास आणि दुसऱ्या शिक्षणक्रमास या विद्यापीठात प्रवेश घेत असल्यास पहिल्या शिक्षणक्रमाला विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचा लाभ झाला असल्यास पुन्हा त्याच स्तरावरील दुसऱ्या शिक्षणक्रमास शिष्यवृत्ती देय नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या पहिला पदवी/पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या पारंपारिक महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्याचे **शिष्यवृत्ती घेतली असल्याचे / नसल्याचे ना हरकत पत्र मेलद्वारे पाठविणे अनिवार्य आहे.**
- विद्यार्थ्याने नियमित महाविद्यालयातून पदवीका, पदवी किंवा पदव्युत्तर स्तरावरील व्यावसायिक (Professional) शिक्षणक्रमास प्रवेश घेऊन शैक्षणिक सत्र 2026-27 मध्ये या विद्यापीठात अव्यावसायिक (Non Professional) शिक्षणक्रमास प्रवेश घेत असल्यास आणि व्यावसायिक शिक्षणक्रमाला विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचा लाभ झाला असल्यास विद्यार्थ्याला या विद्यापीठात प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमास शिष्यवृत्ती देय नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या पहिला पदवीका, पदवी किंवा पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या पारंपारिक महाविद्यालयाच्या व्यावसायिक शिक्षणक्रमास **शिष्यवृत्ती घेतली असल्याचे / नसल्याचे प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्याचेना हरकत पत्रमेलद्वारे पाठविणे अनिवार्य आहे.**
- **अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती अर्ज विद्यापीठाकडून अनावधानाने संबंधित विभागाकडे अग्रेषित होऊन त्यानंतर संबंधित विभागाकडून नामंजूर झाल्यास/अपात्र ठरविल्यास शिष्यवृत्ती देय नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
- मेलद्वारे दस्तऐवज प्राप्त झाल्यांतरच विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्जावर कार्यवाही करता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी मेलद्वारे दस्तऐवज तातडीने पाठवावेत.
- शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यालाच मिळत असल्याने विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीबाबत जागरूक असणे आवश्यक आहे. त्यासाठी शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यानंतर विद्यार्थ्याने सातत्याने महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्ती अर्जाची सद्यस्थिती (Status) व मेल तपासणे आवश्यक आहे. कारण अर्जात त्रुटी असल्यास विद्यार्थ्यास त्या कळविण्यात येतात, कळविल्यानुसार त्रुटींची पूर्तता करून विद्यार्थ्याने तातडीनेRe-Apply करणे अनिवार्य आहे.
- विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमधील वारंवार दिलेल्या सूचना वाचणे महाडिबीटीकडून SMS व विद्यापीठाकडून वेळोवेळी पाठविलेले जाणारे मेल आणि आपल्या अभ्यासकेंद्राने WhatsApp समूह तयार केले असल्यास त्यावरील सूचना वाचून त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

- शिष्यवृत्तीसंदर्भात काहीही शंका, अडचणी असल्यास अथवा संपर्क करावयाचा असल्यास कार्यालयीन वेळेत **(0253) 2230050** या दूरध्वनी क्रमांकावर तसेच **scholarship@ycmou.ac.in** या मेल आयडीवर संपर्क करता येईल
- **शिष्यवृत्ती पर्यायाने प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी माहितीपुस्तिकेत दिलेल्या संपूर्ण शुल्काची रक्कम विद्यापीठाकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर रक्कम जमा करण्यासाठी अंतिम परीक्षेपूर्वी नोंदणी कक्षाला nondani@ycmou.digitaluniversity.ac या मेलवर विनंती अर्ज करून Payment Link मागवायची असून, त्या Link द्वारे संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क जमा करावयाचे आहे.**
- **विद्यार्थ्याने संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क जमा केल्यानंतरच शासनाकडून विद्यापीठ खात्यावर जमा होणारी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार लिंक बँक खात्यावर जमा करण्यात येईल.**
- शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षणक्रम शुल्क शासनाकडून विद्यापीठाच्या व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती रक्कम म्हणून जमा करण्यात येते, शासन निर्णय क्रमांक भासशि-2021/प्र.क्र.156/शिक्षण-1 दि. 07 जुलै 2023 अन्वये विद्यार्थ्यांच्या खात्यावर सदर रक्कम जमा झाल्यानंतर पुढील सात दिवसाच्या आत विद्यार्थ्याने हे शुल्क विद्यापीठाकडे पाठविणे अनिवार्य राहिल. त्यासंदर्भातील हमीपत्र (परिशिष्ट 6) सोबत जोडलेले आहे, ते विद्यार्थ्याने प्रवेशावेळी विद्यापीठ सकेतस्थळावर अपलोड करावयाचे असून, शिष्यवृत्ती अर्ज भरल्यानंतर मेलद्वारे देखील पाठवायचे आहे.
- विद्यार्थ्याने विद्यार्थ्याच्या खात्यावर जमा झालेली रक्कम विद्यापीठाकडे पाठविल्यानंतर माहितीपुस्तिकेत दर्शविलेल्या एकूण शुल्कापेक्षा जास्त रक्कम विद्यापीठाला विद्यार्थी/अभ्यासकेंद्राकडून प्राप्त झाली असल्यास ती रक्कम विद्यापीठाकडून विद्यार्थ्याच्या आधार लिंक बँक खात्यावर जमा करण्यात येईल. त्यासाठी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमध्ये सूचनापत्र प्रसिद्ध करण्यात येते.

**(मूळ प्रतीवर मा. संचालक, विसेवि यांची स्वाक्षरी आहे)**
**संचालक,**
**विद्यार्थी सेवा विभाग,**
**य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक**

# विद्यार्थ्याचे हमीपत्र 1

समाज कल्याण कार्यालय, नाशिक यांचे आदेशानुसार या विद्यापीठातील विद्यार्थ्याला व्यावसायिक/अव्यावसायिक शिक्षणक्रमांपैकी एकाच शिक्षणक्रमाला शिष्यवृत्ती देय असल्यामुळे हमीपत्र सादर करीत आहे.

मी ........................................................................................................ शैक्षणिक सत्र ....................... मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ......................................................................................... या अभ्यासकेंद्रावर (केंद्र सांकेतांक .............) ......................................................................................... या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतला असून, माझा ऑनलाइन अर्ज क्र. / PRN...................................... असा व महाडिबीटी संकेतस्थळावरील Application NO. ........................................................................................ आहे.

मी या विद्यापीठातून यापूर्वी कुठल्याही शिक्षणक्रमासाठी शिष्यवृत्ती अर्ज सादर केला नसून पहिल्यांदाच शिष्यवृत्ती अर्ज सादर करीत आहे.

**( )**

**(विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी)**

**परिशिष्ट 2 भाग 1**

# अभ्यासकेंद्राचे हमीपत्र

समाज कल्याण कार्यालय, नाशिक यांचे आदेशानुसार या विद्यापीठातील शिष्यवृत्ती अर्ज सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक असणे अनिवार्य असल्यामुळे हमीपत्र सादर करीत आहे.

श्री/श्रीमती.......................................................................................................... या विद्यार्थ्याने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठाच्या आमच्या ........................................................................................ या अभ्यासकेंद्रावर (केंद्र सांकेतांक .............) ....................................................................................................... या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतला असून, विद्यार्थ्याचा प्रवेश अर्ज क्र./ कायम नोंदणी क्रमांक ..................................... व महाडिबीटी संकेतस्थळावरील Application NO. ........................................................................................ असा आहे.

प्रवेशित शिक्षणक्रमासाठी अभ्यासकेंद्राकडून आयोजिलेल्या संपर्कसत्रांना आजतागायत विद्यार्थ्याची उपस्थिती 75 टक्के / 75 टक्केपेक्षा अधिक असून, संपर्कसत्र हजेरीपत्रक सोबत जोडले आहे.

**(स्वाक्षरी)**

**केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक**

**अभ्यासकेंद्राचे नाव :**

**केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजकांचे नाव :**

**केंद्रप्रमुख / केंद्रसंयोजकांचा भ्रमणध्वनी क्रमांक :**

**(अभ्यासकेंद्र शिक्का)**

परिशिष्ट2 भाग 2

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

### संपर्क सत्र हजेरीपत्रक

**विद्यार्थ्याचे नाव :.......................................................................... शैक्षणिक सत्र – 202  - 2**

**शिक्षणक्रमाचे नाव : ........................................................................ शिक्षणक्रम सांकेतांक : ................**

**अभ्यासकेंद्राचे नाव : ....................................................................... अभ्यासकेंद्र सांकेतांक : ...............**

**प्रवेश अर्ज क्र./PRN: ........................................... शिष्यवृत्ती अर्ज Application No. ...........................................**

| अ.क्र | संपर्कसत्र दिनांक | विद्यार्थ्याची स्वाक्षरी | अ.क्र | संपर्कसत्र दिनांक | विद्यार्थ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| 01. | | | | | |
| 02. | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**स्वाक्षरी**
**केंद्रप्रमुख / केंद्रसंयोजक,**

**अभ्यासकेंद्राचा शिक्का**

**परिशिष्ट 3**

# विद्यार्थ्याचे हमीपत्र 2

**शिष्यवृत्ती योजनेचा पर्याय स्वीकारून प्रवेश अर्ज सादर करणा-या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळावरून ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करतेवेळी अपलोड करावयाचे हमीपत्र**

मी कु/श्री/श्रीमती........................................................................................ जात प्रवर्ग ................................

प्रवेश अर्ज/कायम नोंदणी क्रमांक...................................................... यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक संचलित ................................................................................. या अभ्यासकेंद्रावर (अभ्यासकेंद्र सांकेतांक .........) शैक्षणिक सत्र 202 - 2 मध्ये ................................................................................................ या शिक्षणक्रमाच्या प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षासाठी शिष्यवृत्तीचा पर्यायस्वीकारून प्रवेश घेत असून, विद्यापीठ संकेतस्थळावरील ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर शासनाच्या https://mahadbt2.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरून ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर केला / करणारआहे.

01. मी ycmou.digitaluniversity.ac या विद्यापीठ संकेतस्थळावरील संगणकाच्या उजव्या बाजूला असलेल्या शिष्यवृत्ती टॅबमध्ये प्रसिद्ध केलेली शैक्षणिक सत्र 2026-27 चे सूचनापत्र/नियमावली पूर्णपणे वाचली असून, या सूचनापत्रात दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करण्याची मी हमी देत आहे.

02. मी विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमधील प्रसिद्ध केलेल्या नियमावलीसोबत जोडलेल्या यादीतील नमूद केलेले व शिष्यवृत्तीसाठी माझ्या प्रवर्गासाठी व प्रवेशित शिक्षणक्रमासाठी आवश्यक असलेले सर्वच दस्तऐवजांच्या मूळ प्रती प्रवेश घेताना विद्यापीठ संकेतस्थळावर व शासनाच्या https://mahadbt2.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरील ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना अपलोड करण्याची हमी देत आहे.

03. मी सादर केलेला ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज कुठल्याही कारणास्तव रद्द झाल्यास/अपात्र ठरल्यास/ शासनाकडून विहित मुदतीत विद्यापीठ खात्यावर शिष्यवृत्ती रक्कम जमा न झाल्यास तातडीने एकरकमी संपूर्ण/ उर्वरित शिक्षणक्रम शुल्क जमा करण्याची हमी देत आहे.

04. माझ्या अभ्यासकेंद्रावर आयोजित होणा-या संपर्कसत्रांना 75 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त उपस्थित राहण्याची व त्याचे स्वतंत्र हमीपत्र परिशिष्ट 2 भाग 1 व 2 मेलद्वारे पाठविण्याची मी हमी देत आहे.

05. विद्यापीठाकडून अथवा **MahaDBT 2.0** संकेतस्थळाकडून कुठल्याही मार्गाने मला प्राप्त होणा-या सूचनांचे पालन करण्याची मी हमी देत आहे.

06. मुक्त विद्यापीठात प्रवेशित असताना कोणत्याही एकाच व्यावसायिक (Professional) / अव्यावसायिक (Non Professional) शिक्षणक्रमाला शिष्यवृत्ती देय असल्याचे मला माहित असून, मी या विद्यापीठांतर्गत पहिल्यांदाच शिष्यवृत्ती अर्ज सादर करीत असून, त्याचे स्वतंत्र हमीपत्र (परिशिष्ट 1) सादर करण्याची हमी देत आहे.

07. scholarship@ycmou.ac.in या मेलवरून आलेल्या सूचनांचे पालन करण्याची व मेलला तातडीने उत्तर देण्याची मी हमी देत आहे.

**स्थळ :** **विद्यार्थ्याचे नाव :**

**दिनांक :** **विद्यार्थ्याची स्वाक्षरी**

परिशिष्ट 4

# विद्यार्थ्याची प्राथमिक माहिती व विद्यार्थ्याचे हमीपत्र 3

**प्रति,**

**मा. संचालक,**

**विद्यार्थी सेवा विभाग,**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**शैक्षणिक वर्ष : ..........................................**

**विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव : ................................................................................................................................................**

**प्रवेश अर्ज भरताना नमूद केलेले नाव : ..................................................................................................................**

**नावात बदल असल्यास बदललेले नाव : ..................................................................................................................**

**(आधार कार्डवरील / विवाहित महिलांचे विवाहानंतरते बदललेले/इतर कुठल्याही कारणाने नावात बदल असल्यास)**

**प्रवेश घेणार असलेल्या अभ्यासकेंद्राचे (विद्यार्थी सहायता केंद्र) नाव व (अभ्यासकेंद्र सांकेतांक) ................................**

**...........................................................................................................................................................................**

**प्रवेश घेणार असलेल्या शिक्षणक्रमाचे नाव व वर्ष : ..................................................................................................**

**विद्यापीठात यापूर्वीच प्रवेशित असल्यास कायम नोंदणी क्रमांक : ....................................................................................**

**विद्यार्थ्याचा वापरात असलेला भ्रमणध्वनी क्रमांक : ..................................................................................................**

**विद्यार्थ्याचा वापरात असलेला email id : ..................................................................................................................**

**मी शिष्यवृत्ती पर्यायाने प्रवेश घेऊन महाडिबीटी 2.0 या शासनाच्या शिष्यवृत्ती संकेतस्थळावरून ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची हमी देत आहे.**

**मी प्रवेश अर्जात व ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्जात सद्यस्थितीत वापरात व कार्यरत असलेला भ्रमणध्वनी क्रमांक व मेल आयडी नमूद करण्याची हमी देत आहे.**

**शिष्यवृत्ती कक्षाकडून मेलद्वारे कळविलेल्या शिष्यवृत्ती अर्जातील त्रुटींची तातडीने पूर्तता करण्याची मी हमी देत आहे.**

**मी ऑनलाइन भरलेला शिष्यवृत्ती अर्ज मंजूर झाल्यास / Department Login ला पेंडिंग असल्यास / Under Scrutiny असल्यास / Under DDO असल्यास / कुठल्याही कारणाने शिष्यवृत्ती अर्ज रद्द झाल्यास / शासनाकडून शिष्यवृत्तीचा पहिला हप्ता मंजूर झाला मात्र दुसरा हप्ता वेळेत मंजूर न झाल्यास / माहितीपुस्तिकेत दर्शविलेले संपूर्ण नियमित शुल्क शासनाकडून एप्रिल 2027 पूर्वी विद्यापीठाला प्राप्त न झाल्यास माहितीपुस्तिकेत दर्शविलेले संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क (प्रवेशावेळी जमा केलेले व शासनाकडून विद्यापीठाला प्राप्त झालेली रक्कम वगळून) एकरकमी जमा करण्याची हमी मी देत असून, मी संपूर्ण शुल्क जमा केल्यानंतर शासनाकडून प्राप्त झालेल्या रकमेपैकी उर्वरित रक्कम (असल्यास) विद्यापीठाने मला परत पाठवावी अशी मी विनंती करीत आहे. त्यासाठी मी नोंदणी कक्षाशी मेलद्वारे संपर्क करण्याची हमी देत आहे.**

**स्थळ :** **विद्यार्थ्याचे नाव :**

**दिनांक :** **विद्यार्थ्याची स्वाक्षरी**

# परिशिष्ट 5

## आवश्यक दस्तऐवजांची माहिती

**प्रवेश अर्ज सादर करताना विद्यापीठ संकेतस्थळावर व ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना MahaDBT 2.0 संकेतस्थळावर अपलोड करावयाचे दस्तऐवज**

01. 10 वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका
02. 12वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका
03. पूर्वशिक्षणाची उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका(शैक्षणिक सत्र 2026-27 मध्ये प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमासाठी आवश्यक असलेली पात्रता धारण करत असलेल्या शिक्षणक्रमाची)
04. शाळा/महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची मूळ प्रत(Duplicate असल्यास मूळ प्रत का अपलोड करत नाही त्या कारणाचे शपथपत्र आवश्यक)
05. 2025-26 या आर्थिक वर्षाचा स्वत:च्या / वडिलांच्या / पतीच्या नावे असलेल्या उत्पन्न दाखल्याची मूळ प्रत (आईच्या नावाने उत्पन्न दाखला असल्यास त्यासोबत वडीलांचे मृत्यू प्रमाणपत्र) Renewal अर्ज भरताना यापूर्वी अपलोड केलेला उत्पन्न दाखला
06. जात प्रमाणपत्र
07. जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity) (केवळ व्यावसायिक (Professional) शिक्षणक्रमांसाठी
08. रहिवासी प्रमाणपत्र
09. Non Creamy Layer (VJNT/SBC/OBC/SEBC प्रवर्गासाठी)
10. Declaration Certificate (VJNT/SBC/OBC/SEBC प्रवर्गासाठी)
11. रेशनकार्ड (VJNT/SBC/OBC/SEBC प्रवर्गासाठी)
12. EWS प्रमाणपत्र
13. शिक्षणात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र (Gap Certificate)
14. शिष्यवृत्ती घेतली असल्याचे / नसल्याचे मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्याचे ना हरकत पत्र

**scholarship@ycmou.ac.inया mail id वर पाठवावयाचे दस्तऐवज**

01. याच सूचनापत्रात सांगितल्याप्रमाणे **File 1, File 2 व File 3 अशा तीन स्वतंत्र Scan Files**

**MahaDBT 2.0 संकेतस्थळामार्फत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना संकेतस्थळावर दस्तऐवज अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नसल्यास विद्यार्थी पुढीलप्रमाणे एकापेक्षा जास्त दस्तऐवज एकत्र स्कॅन करून अपलोड करू शकतात.**

01. SSC उत्तीर्ण**सोबत** अनुत्तीर्ण असलेल्या गुणपत्रिका
02. HSC उत्तीर्ण**सोबत** अनुत्तीर्ण असलेल्या गुणपत्रिका
03. पूर्वशिक्षणाच्या उत्तीर्ण**सोबत** अनुत्तीर्ण असलेल्या गुणपत्रिका
04. शाळा/महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्या**सोबत** खंड प्रमाणपत्र / नाव बदलाचे राजपत्र किंवा शपथपत्र//शिष्यवृत्ती घेतली असल्याचे / नसल्याचे मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्याचे ना हरकत पत्र
05. जात प्रमाणपत्रा**सोबत** जात वैधता प्रमाणपत्र (व्यावसायिक शिक्षणक्रमास प्रवेश असल्यास
06. जात प्रमाणपत्रा**सोबत** नॉन क्रिमिलेयर (VJNT/SBC/OBC/SEBC प्रवर्गासाठी)
07. उत्पन्न दाखल्यासोबत वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र /विवाह नोंदणी प्रमाणपत्र / राजपत्र / आई-वडिलांव्यतिरिक्त कुटुंबातील इतर सदस्यांच्या नावे उत्पन्न दाखला असल्यास ज्याचे नावे उत्पन्न दाखला आहे अशी व्यक्ती व विदयार्थी यांचे नाव असलेले रेशन कार्ड

**परिशिष्ट 6**

**"भारत सरकार मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्याच्या बँक खात्यात जमा झालेली महाविद्यालयास देय शुल्काची रक्कम सात दिवसांच्या आत विद्यापीठाकडे जमा करण्याबाबतचे हमीपत्र"**

**हमीपत्र / UNDERTAKING**

मी, श्री./सौ/कु. ____________________________________________

शैक्षणिक वर्ष : ____________ अभ्यासकेंद्राचे नाव : ______________________________

PRN ______________________ Mahadbt Application No. : ________________

शिक्षणक्रम ____________________________________ वर्ष : I / II / III

याद्वारे हमी देतो/देते की, शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर होणारी व विद्यापीठास देय असलेली सर्व प्रकारची ना-परतावा शुल्क (Non-Refundable Fees) रक्कम माझ्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर, शासन निर्णय क्र. भासशि-2021/प्र.क्र.156/शिक्षण-1, दिनांक 07 जुलै 2023 मधील तरतुदींनुसार सदर रक्कम पुढील सात (07) दिवसांच्या आत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे जमा करणे माझ्यावर बंधनकारक राहील.

शिष्यवृत्तीची रक्कम माझ्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर, सदर रक्कम महाविद्यालयाकडे जमा करण्यासाठी आवश्यक असलेली Payment Link प्राप्त करण्याकरिता मी विद्यापीठाने यासाठी निर्दिष्ट केलेल्या nondani@ycmou.digitaluniversity.ac या ई-मेल आयडीवर विनंती करीन. माझ्या विनंतीनंतर व विद्यापीठाच्या नोंदणी कक्षाकडून Payment Link उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर मी निर्धारित मुदतीत संपूर्ण रक्कम विद्यापीठाकडे Online पद्धतीने जमा करीन.

मी शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत ती विद्यापीठाकडे जमा न केल्यास अथवा शासनाच्या अटी व शर्तींचे पालन न केल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. अशा परिस्थितीत विद्यापीठ अथवा शासन यांचेकडून करण्यात येणारी कोणतीही प्रशासकीय, आर्थिक किंवा कायदेशीर कार्यवाही मला मान्य राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

मी वरील सर्व बाबी काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला पूर्णपणे समजल्याआहेत. मी त्यांचे पालन करण्याची हमी देत आहे.

दिनांक : ____ / ____ / ______ विद्यार्थ्याची स्वाक्षरी : ____________________

ठिकाण : ________________ विद्यार्थ्याचे पूर्ण नाव: ____________________

मोबाईल क्रमांक : ____________________

ई-मेल आयडी : ____________________

**सूचना :**

शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर Payment Link मिळविण्यासाठी विद्यार्थ्याने विद्यापीठाच्या nondani@ycmou.digitaluniversity.ac या अधिकृत ई-मेल आयडीवर संपर्क साधणे आवश्यक आहे.

**पालक/पालक प्रतिनिधीची संमती**

मी, श्री./सौ. ______________________________, विद्यार्थी/विद्यार्थिनी ____________________ यांचा/यांची पालक असून वरील हमीपत्रातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर अटी व शर्तींचे पालन करण्यास आम्ही बांधील आहोत.

दिनांक : ____ / ____ / ______ पालकाची स्वाक्षरी : ____________________

पालकाचे नाव : ____________________ मोबाईल क्रमांक : ____________________

## प्रवर्गानुसार शासनाचे विभाग व विभागानुसार शिष्यवृत्ती योजना (परिशिष्ट ७)

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रवर्गासाठीचा विभाग | या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवर्गनिहाय व विभागांतर्गत लागू असलेली शिष्यवृत्ती योजना |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती<br>Schedule Caste (SC) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग<br>Social Justice & Special Assistance Department | भारत सरकार पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप<br>Government of India Post Matric Scholalrship |
| २ | अनुसूचित जमाती<br>Schedule Tribe (ST) | आदिवासी विकास विभाग<br>Tribal Development Department | पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप (भारत सरकार)<br>Post Matric Scholalrship (Government of India) |
| ३ | इतर मागास वर्ग<br>Other Backward Class (OBC) | इमाव, सामाजिक, आर्थिक दुर्बल घटक, विजाभज व विमाप्र कल्याण विभाग<br>OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department | इमाव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप<br>Post Matric Scholarship to OBC Students |
| ४ | विमुक्त जाती व भटक्या जमाती<br>Vimukt Jati & Nomadic Tribe (VJNT) | इमाव, सामाजिक, आर्थिक दुर्बल घटक, विजाभज व विमाप्र कल्याण विभाग<br>OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department | विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप<br>Post Matric Scholarship to VJNT Students |
| ५ | विशेष मागास प्रवर्ग<br>Special Backward Class (SBC) | इमाव, सामाजिक, आर्थिक दुर्बल घटक, विजाभज व विमाप्र कल्याण विभाग<br>OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department | विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप<br>Post Matric Scholarship to SBC Students |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक<br>Economically Weaker Section (EWS) | उच्च शिक्षण संचालनालय<br>Directorate of Higher Education | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना<br>Rajashri Chatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Scheme |

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेशित विद्यार्थ्यांनी केवळ उपरोक्त तक्त्यातीलच त्यांच्या जात प्रवर्गासमोर दर्शविलेल्या योजनेसाठी ते पात्र असल्यास अर्ज करावा.**